४६१

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १३/१२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीसीटी ३६१६/प्र.क्र.७६/भाग-७ /पोल-३,दि.१० डिसेंबर-२०२४

**विषय :-** पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून मे.पीडब्ल्युसी या कंपनीला मुदतवाढ देण्याबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीसीटी ३६१६/प्र.क्र.७६/भाग-७, /पोल-३ दिनांक दिनांक १२ डिसेंबर-२०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२१०१२४९०७४७२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, पुणे शहर
पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड
अपर पोलीस महासंचालक (नि. व स),महाराष्ट्र राज्य मुंबई
कार्यासन अधिकारी का.क्र.१७

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून मे.पीडब्ल्युसी या कंपनीला मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-३६१६/प्र.क्र.७६/भाग-७/पोल-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १०.१२.२०२४.

**वाचा :**

१. शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान विभाग क्र. GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/o Directorate of IT-DIT (MH), दि.०१.०७.२०१४.
२. शासन निर्णय, गृह विभाग क्र. गृहआ २०१५/प्र.क्र.२३०/आस्था-२, दि.२०.५.२०१५.
३. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी ३६१५/प्र.क्र.९३/पोल-३, दि.२९.५.२०१५.
४. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी ३६१६/प्र.क्र.७६/भाग-१/पोल-३, दि.२५.७.२०१६.
५. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी ३६१६/प्र.क्र.७६/भाग-१/पोल-३, दि.२८.९.२०२२.
६. शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान विभाग क्र. GAD मातंसं ०८०/४/२०१४-O/O, दि.०९.०५.२०१९.
७. शासन परिपत्रक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, No. GAD-IT 080/4/2014-O/O, Directorate of IT DIT (MH) Dt.24.4.2023 व Dt. 5.10.2023
८. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी ३६१६/प्र.क्र.७६/भाग-७/पोल-३, दि.२.८.२०२३, दि.१२.२.२०२४.
९. गृह विभाग, उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या (HPC) दि.३०.९.२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :**

पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून मे. पीडब्ल्युसी कंपनीची शासन निर्णय, गृह विभाग समक्रमांक दि.२९.०५.२०१५ अन्वये दि.३०.०४.२०१६ पर्यंत नेमणूक करण्यात आली होती. तद्नंतर शासन निर्णय, गृह विभाग समक्रमांक दि.२५.०७.२०१६ अन्वये दि.३१.१०.२०१६ पर्यंत, शासन निर्णय, गृह विभाग दि.०५.०६.२०१७ अन्वये दि.३०.०६.२०१७ पर्यंत, शासन निर्णय, गृह विभाग दि.२५.०७.२०१७ अन्वये दि.३०.०६.२०१८ पर्यंत, शासन निर्णय, गृह विभाग दि.१३.१२.२०१८ अन्वये दि.३०.०६.२०१९ पर्यंत, शासन निर्णय, गृह विभाग दि.२३.१०.२०१९ अन्वये दि.३०.१०.२०२० पर्यंत, शासन निर्णय, गृह विभाग दि.११.०६.२०२१ अन्वये दि.३०.०६.२०२१ पर्यंत, शासन निर्णय, गृह विभाग दि.२४.११.२०२१ अन्वये दि.३१.१०.२०२१ पर्यंत, शासन निर्णय, गृह विभाग दि.०२.०२.२०२२ अन्वये दि.३१.०१.२०२२ पर्यंत, शासन निर्णय, गृह विभाग दि.०९.०५.२०२२ अन्वये दि.३०.०४.२०२२ पर्यंत व शासन निर्णय, गृह विभाग दि.२८.९.२०२२ अन्वये दि.३१.०३.२०२३ पर्यंत आणि शासन निर्णय, गृह विभाग दि.२.८.२०२३ अन्वये दि. १९.९.२०२३ अखेर आणि शासन निर्णय, गृह विभाग १२.२.२०२४ अन्वये दि.३०.६.२०२४ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्प कार्यान्वयन कालावधी दरम्यान शासन व पोलीस प्रशासनास तांत्रिक सहाय्य करण्यासाठी सल्लागारांची आवश्यकता आहे. त्यानुषंगाने दि.३०.९.२०२४ च्या उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीमध्ये मे. पीडब्ल्युसी कंपनीला पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.३०.९.२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या एका वरीष्ठ सल्लागारास व एका सल्लागारास व एका सहयोगी सल्लागारास दि.१.७.२०२४ ते दि.३०.६.२०२५ पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागाच्या शासन परिपत्रक क्र. **GAD-IT080/4/2014-O/O, Directorate of IT - DIT (MH), Dt. 5.10.2023** नुसार मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. उपरोक्त सल्लागारांना देण्यात येणारे मानधन व इतर भत्ते माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या संदर्भ क्र. ७ येथे नमूद दि.५.१०.२०२३ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार देय राहील

३. सर्व सल्लागारांना देण्यात येणारे मानधन हे दरमहा-प्रती व्यक्ती (Man-Month) तत्वानुसार असेल. सर्व सल्लागारांचे दरमहा देयके शासनास सादर करतांना सल्लागारांनी उद्दीष्टपूर्तीच्या अनुषंगाने महिन्याच्या कालावधीत केलेल्या कामाचा तपशील / अहवाल शासनास पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

४. पुणे सीसीटीव्ही प्रकल्पासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारांच्या मानधनाबाबतचा खर्च पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या "२०५५-पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००) (०१) जिल्हा पोलीस बल, १३, कार्यालयीन खर्च (२०५५ ०१६८)" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१२१०१२४९०७४७२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RUPALI SANJOG KABARE

Digitally signed by RUPALI SANJOG KABARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=825ec39543f0d33deccec30f6ca54b1adc430443efec55f07e98dc173423779d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5CB43A03D973FF96AABBF02A74864A4681399FE663D8FBDE0441A596BEB3ACDD, cn=RUPALI SANJOG KABARE
Date: 2024.12.10 12:51:29 +05'30'

**( रुपाली कबरे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस आयुक्त, पुणे.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१३. निवडनस्ती, पोल-३